कार्यालय पोलीस ठाणे ता. गंगाखेड जि. परभणी



N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** गंगाखेड **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0014 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/01/2022 23:19 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 14/01/2022

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/01/2022

**Time From (वेळेपासून):** 14:06 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 14/01/2022 **Time (वेळ):** 23:07 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 041 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/01/2022 23:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नगर परिषद कलनी, गंगाखेड,गंगाखेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** साहेबराव बाबुराव घरजाळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | श्रीरामनगर, पालम रोड, गंगाखेड,गंगाखेड,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अरबुजवाडी तागंगाखेड जिपरभणी,गंगाखेड,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8796658796

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शंकर तुकाराम गोरे | | | 1. तिरुपती निवास, शिवराम नगर,वसमत रोड, परभणी,मोधा,परभणी,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 10 नोटा | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 5,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक :- 14/01/2022.पोलीस ठाणे गंगाखेड.मी साहेबराव बाबुराव घरजाळे, वय-42 वर्ष, व्यवसाय शेती, रा.अरबुजवाडी ता.गंगाखेड जि.परभणी ह.मु. श्रीरामनगर, पालम रोड, गंगाखेड ता.गंगाखेड जि.परभणी मो.क्र.8796658796, 9421460648 मी दिनांक 30/12/2021 रोजी श्री.राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद, अतिरिक्त पदभार लाचलुचपत प्रतिबंधक, विभाग नांदेड यांना फोन करुन माझी एका लोकसेवकाविरुध्द पैसे मागत असलेबाबत तक्रार असल्याचे सांगुन गंगाखेड येथे येवुन माझी तक्रार घेऊन कारवाई करणे बाबत विनंती केली असता, पोलीस अधीक्षक, श्री.राहुल खाडे यांनी तुम्हाला आमचे अधिकारी फोन करतील असे सांगितले. त्यानंतर दिनांक 30/12/2021 रोजी श्री.भारत राऊत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांनी मला फोन केला असता, मी त्यांना कळवले की, माझी एक लोकसेवका विरुध्द पैसे मागत असले बाबतची तक्रार आहे. मला लोकसेवक यांनी नंतर भेटण्यासाठी बोलविले आहे. ज्या दिवशी मला लोकसेवक भेटण्यासाठी बोलवतील, त्या दिवशी मी आपणाशी संपर्क करुन कळवील, त्यावेळी आपण गंगाखेड येथे येऊन माझी तक्रार घेऊन कारवाई करावी असे कळवले होते. मी श्री.भारत राऊत पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांना फोन करुन दिनांक 13/01/2022 रोजी तलाठी गोरे यांना भेण्यासाठी जाणार आहे, आपण गंगाखेड जि.परभणी येथे येवुन माझी तक्रार घेऊन कारवाई करणे बाबत कळवले. त्यावरुन श्री.भारत राऊत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड हे पंच व स्टाफ सह गंगाखेड जि.परभणी येथे सुरक्षीत ठिकाणी हजर आले.त्यानंतर दिनांक 13/01/2021 रोजी मी लाप्रवि बीड येथील पोलीस उप अधिक्षक श्री.भारत राऊत यांचेकडे तक्रार दिली की, माझे नावे मौजे अरबुजवाडी ता.गंगाखेड जि.परभणी येथे शेत गट/ सर्वे नं 99 मध्ये 53 आर जमीन आहे, सदर जमीनीमध्ये 60 आंब्यांचे झाडांची लागवड केलेली आहे. माझी पत्नी नामे श्रीमती कालींदा साहेबराव घरजाळे, यांचे नावे मौजे अरबुजवाडी शिवारात शेत गट नं./ सर्वे नं 99 मध्ये 1 हेक्टर 05 आर जमीन असुन सदर जमीनीमध्ये सिताफळाचे 450 झाड व पेरुचे 850 झाडांची लागवड केलेली आहे. तसेच माझे काका रामकिसन सोपान मुंडे रा.आरबुजवाडी यांचे नावे मौजे अरबुजवाडी शिवारात शेत गट नं./सर्वे नं. 126 मध्ये 87 आर जमीन असुन, सदर जमीनीमध्ये त्यांनी सिताफळाचे 1000 झाड, सागाचे 7 व चिंचाचे 1 झाडांची लागवड केलेली आहे. माझे स्वत:चे, माझी पत्नी श्रीमती कालींदा घरजाळे, व माझे काका श्री.रामकिसन मुंडे यांचे नावे असलेल्या शेतामध्ये लागवड केलेल्या फळझाडांची 7/12 उता-यावर नोंद करण्यासाठी, माझा, माझी पत्नी तसेच काका मुंडे यांचे दिनांक 08/12/2021 रोजीचे त्या संदर्भातील अर्ज घेवुन मी तलाठी सज्जा, ईसाद चे तलाठी श्री.गोरे यांची दिनांक 28/12/2021 रोजी भेट घेवुन त्यांचेकडे झाडांची नोंद करण्यासाठीचे अर्ज, शपथपत्र व जिओ टगींग फोटो दिले असता, तलाठी श्री.गोरे यांनी माझे कागदपत्राची पाहणी करुन मला सदर



Scanned with CamScanner

फळझाडांची 7/12 उता-यावर नोंद करण्यासाठी 6000/-रु. लागतील असे सांगीतले. त्यावेळी मी तलाठी श्री.गोरे यांना 6000/-रु. कशाचे असे विचारले असता, तलाठी श्री.गोरे यांनी सदरचे कागदपत्र माझेकडे परत देऊन मला 6000/-रु. दिल्याशिवाय तुमच्या फळझाडांची नोंद होणार नाही असे सांगीतले. त्यावेळी मला कळुन चुकले की, तलाठी श्री.गोरे हे मागत असलेले पैसे हे लाचेचेच आहेत. मला तलाठी श्री.गोरे यांना पैसे देण्याची मुळीच इच्छा नसल्याने, मी त्यांचेविरुध्द तक्रार देत आहे वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.मी दिलेल्या तक्रारीवरुन दि. 13/01/2022 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री.भारत राऊत यांनी तलाठी श्री.शंकर गोरे हे माझ्याकडे माझे कामासाठी लाचेची मागणी करतात किंवा कसे याबाबत पडताळणी करण्याचे ठरविले. त्यानंतर श्री.भारत राऊत यांनी कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या व व्हाईस रेकर्डर बाबत माहिति देऊन व्हाईस रेकर्ड चालु करुन माझेकडे देऊन मला व पंच क्रमांक 1 श्री. पवार यांना लोकसेवक श्री.शंकर गोरे यांची भेट घेण्यासाठी गंगाखेड येथील तलाठी कार्यालय, बुलढाणा बँकेच्या बाजुला, गंगाखेड येथे पाठविले. मी व पंच क्रमांक 1 असे माझे कडील मोटार सायकलने तलाठी कार्यालय, बुलढाणा बँकेच्या बाजुला, गंगाखेड येथे गेलो, त्याठिकाणी तलाठी श्री.गोरे यांची भेट झाली नाही. त्यामुळे मी तलाठी श्री. गोरे यांना फोन केला असता, मला त्यांनी भेटण्यासाठी रेस्ट हाउस, गंगाखेड येथे बोलावले. त्यानंतर मी व पंच क्र 1 पवार असे रेस्ट हाउस गंगाखेड येथे गेलो. त्याठिकाणी माझी व तलाठी श्री शंकर गोरे यांची भेट झाली. त्यादरम्यान माझी व तलाठी श्री शंकर गोरे यांचेत माझे कामाविषयी चर्चा झाली. चर्चे दरम्यान श्री.शंकर गोरे यांनी माझे स्वत:चे, माझी पत्नी श्रीमती कालींदा घरजाळे व माझे काका श्री. रामकिशन मुंडे यांचे मौजे आरबुजवाडी शिवारातील जमीनीमध्ये लागवड केलेल्या फळझाडांची 7/12 उता-यावर नोंद करण्यासाठी 6000/- रु लाचेची मागणी करुन तडजोड अंती 5000/- रु उदीईक दिनांक 14/01/2022 रोजी स्विकारण्याचे मान्य केले. तस दिनांक 13/01/2022 रोजीचा लाचमागणी पडताळणीचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. आज दिनांक 14/01/2022 रोजी तलाठी गोरे यांनी लाच रक्कम घेवुन माझ्या कामासाठी बोलावल्याने, श्री.भारत राऊत सापळा पथकासह गंगाखेड येथे सुरक्षित ठिकाणी आले. मी 12.15 वा.त्यांचे जवळ पोहचल्या नंतर, शासकीय वाहनात शासकीय पंचांसमक्ष श्री.भारत राऊत यांनी मला व दोन्ही पंचांना अँथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लम्प यांचा उपयोग व गुणधर्म सांगुन त्याचे प्रात्यक्षीक दाखवुन, मी हजर केलेल्या 5,000/-रु. लाच रकमेस अँथ्रासीन पावडर लावली व सदरची लाच रक्कम ही माझे पँटचे समोरील उजवे खिशात ठेवली. मला लाच स्वीकृतीनंतर करावयाचा ईशारा नेमुन दिला. वगैरे बाबींचा सापळापुर्व कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला.सापळापुर्व कारवाईचा पंचनामा पुर्ण झाल्यानंतर मला, पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हईस रेकर्डर चालु करुन माझ्याकडे देऊन मला व पंच क्र.1 यांना तलाठी श्री. शंकर गोरे यांना लाच रक्कम देण्यासाठी तलाठी सज्जा गुंजेगाव/ईसाद चे कार्यालय, नगर परिषद कलनी, गंगाखेड येथे रवाना करण्यात आले. आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र.2 श्री. कोकरे हे येत होते. मी व पंच क्र.1 पवार असे दोघेही तलाठी सज्जा गुंजेगाव/ईसाद चे कार्यालय, नगर परिषद कलनी, गंगाखेड येथे गेलो. त्याठिकाणी तलाठी श्री. शंकर गोरे हे हजर होते. त्यानंतर माझी व तलाठी श्री.शंकर गोरे यांचेत माझे कामाविषयी चर्चा झाली. त्यावेळी तलाठी गोरे यांनी माझे, माझी पत्नी कालींदाचे व काका रामकिसन मुंढे यांचे फळझाडांच्या नोंदी केलेल्या दाखवुन दोन 7/12 उतारे दिले. त्यानंतर तलाठी श्री.शंकर गोरे यांनी माझेकडे लाचेची मागणी करुन ठरल्याप्रमाणे 5000/-रु. लाच रक्कम उजवे हाताने स्विकारुन लपटपचे खाली ठेवुन दिली. त्यानंतर मी तलाठी सज्जा गुंजेगाव/ईसाद चे कार्यालय, नगर परिषद कलनी, गंगाखेड कार्यालयाचे बाहेर येवुन लाच स्विकारल्या बाबतचा नेमुन दिलेला पुर्व नियोजीत इशारा 14.30 केला. इशारा प्राप्त होताच श्री.भारत राऊत हे पंच क्र.2 व त्यांचे स्टाफसह आमचेजवळ आले. माझ्याकडील व्हईस रेकर्डर ताब्यात घेऊन बंद केला. तेव्हा श्री.भारत राऊत यांनी श्री. शंकर गोरे यांना स्वत:ची, पंचांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. श्री.भारत राऊत यांनी पंच क्र.1 यांना पंच क्र.2 यांचेसमक्ष विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्विकारली ? तेव्हा पंच क्र.1 यांनी सांगितले की, तक्रारदार यांना श्री. शंकर गोरे यांनी लाचेची मागणी करुन स्वत: लाच रक्कम 5000/-रु. स्विकारली, असा खुलासा पंच क्र.1 पवार यांनी केला. त्यानंतर श्री.भारत राऊत यांनी लोकसेवक श्री. शंकर गोरे यांना लाच रक्कमेबाबत विचारले असता, लोकसेवक श्री. शंकर गोरे यांनी सदरची लाच रक्कम स्विकारुन त्यांचे समोरील टेबलवरील लपटपच्या खाली ठेवले असल्याचे संागितले. त्यावर श्री.भारत राऊत यांनी तलाठी श्री.शंकर गोरे यांचेकडील लाच रक्कम 5,000/- रु. पंच क्रं. 2 श्री. कोकरे यांना ताब्यात घेण्यास सांगितले. त्यानंतर श्री.भारत राऊत यांनी तलाठी श्री. शंकर गोरे यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता, त्यांनी त्यांचे नाव शंकर तुकाराम गोरे, वय 36 वर्ष, तलाठी सज्जा गुंजेगाव अतिरीक्त पदभार ईसाद, ता. गंगाखेड, जि. परभणी रा. तिरुपती निवास, शिवराम नगर, परभणी असे सांगितले. त्यानंतर घटनास्थळावर प्राथमीक कारवाई झाल्यानंतर श्री.भारत राऊत, पोलीस उप अधीक्षक, व स्टाफ सह श्री. शंकर गोरे यांना घेऊन पुढील कार्यवाहीसाठी पोलीस स्टेशन गंगाखेड येथे हजर आलोत. त्यानंतर झाले सापळा कारवाई बाबत सविस्तर यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा करण्यात आला.तरी आरोपी लोकसेवक शंकर तुकाराम गोरे वय 36 वर्ष व्यवसाय-नोकरी तलाठी सजा गुंजेगाव-अतिरिक्त पदभार ईसाद ता.गंगाखेड जि.परभणी रा.तिरुपती निवास, शिवराम नगर, वसमत रोड, परभणी मुळ रा.रेणापुर ता.पाथरी जि.परभणी यांनी माझे स्वत:चे, माझी पत्नी श्रीमती कालींदा साहेबराव घरजाळे व काका श्री.रामकिसन सोपान मुंढे यांचे मौजे अरबुजवाडी येथील जमीनीत लागवड केलेल्या फळझाडांची नोंद करण्यासाठी दिनांक 13/01/2022 रोजी 14.07 ते 14.58 वा.चे दरम्यान 6000/-रु. लाचेची मागणी करुन तंडजोडअंती 5000/-रु. लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन, दिनांक 14/01/022 रोजी 14.06 ते 14.30 वा.चे दरम्यान श्रीमती लताबाई बालासाहेब कासांडे यांचे घरातील किरायाने दिलेल्या तलाठी सज्जा गुंजेगाव/ईसाद चे कार्यालय, नगर परिषद कलनी, गंगाखेड येथे लाच रक्कम 5000/-रु. स्वत: स्विकारली असता, लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले आहे. म्हणुन माझी श्री.शंकर तुकाराम गोरे, वय 36 वर्ष, व्यवसाय-नोकरी तलाठी सजा गुंजेगाव-अतिरिक्त पदभार ईसाद ता.गंगाखेड जि.परभणी रा.तिरुपती निवास, शिवराम नगर, वसमत रोड, परभणी मुळ रा.रेणापुर ता.पाथरी जि.परभणी यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. ही फिर्याद दिली, ती माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष

Scanned with CamScanner

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** **(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Vasundhara Vittalrao Borgaonkar(I (Inspector)) / **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** - पो.उपनिरीक्षक - फिरदोस बिडवे

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

मी FIR प्रत मिळाली

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन, गंगाखेड

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** Vasundhara Vittalrao Borgaor

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**

Scanned with CamScanner